**रे. मु. क्र. १३/२०२५**
MHAK110004072025
**मनोज विरुद्ध गजानन**

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ व २ नुसार दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी त्याच्या मिळकतीतून नवीन रस्ता तयार करु नये किंवा त्याच्या मिळकतीच्या उत्तरेकडील बांधावरुन त्याच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये, असा त्यांचेविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम आदेश करणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–

२. मौजे सोनखेड, ता. तेल्हारा येथील सर्वे क्र. ४/अ येथील क्षेत्र ३६ आर ही मिळकत वादी क्र. १ च्या मालकीचे आहे. मौजे ममदाबाद, ता. तेल्हारा येथील सर्वे क्र. ७४/अ, ब, ई व ड हे क्षेत्र प्रतिवादींच्या मालकीचे आहे. प्रतिवादींना त्यांच्या शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध असताना देखील त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार नायब तहसिलदार यांचेकडे प्रकरण दाखल केले. त्यामध्ये नायब तहसिलदार यांनी दि. ०७/१०/२०२४ रोजी प्रतिवादींनी त्यांच्या शेतीची वहिती करण्यासाठी वादीच्या गट क्र. ४/अ च्या उत्तर धु–यावरुन शेताची वहिती करण्याबाबत आदेश केलेला आहे. सदर आदेश हा बेकायदेशीर असून वादीस मान्य नाही; परंतु, असे असताना देखील नायब तहसिलदार यांच्या सदर आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी हे वादीच्या मिळकतीतून नवीन रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करत आहे. सबब, नायब तहसिलदार यांचा आदेश हा रद्द बातल ठरवून मिळण्याकरिता दावा दाखल केल्याचे कथन करुन दाव्याच्या निकालापर्यंत प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीतून नवीन रस्ता तयार करु नये किंवा त्याच्या मिळकतीच्या उत्तरेकडील बांधावरुन त्याच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये, असा त्यांचे विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम आदेश करणेबाबतची मागणी केलेली आहे.

३. प्रतिवादींनी निशाणी १२ वर म्हणणे दाखल करुन वादीचे कथन नाकारलेले आहे व पुढे असे कथन केले आहे की, ते त्यांच्या शेताची वहिती वादीच्या

शेताच्या उत्तरेकडील धु–याच्या आतून करीत होते; परंतु, वादी हा प्रतिवादींना सदर रस्त्यावरुन जाण्यास अडथळा करत असल्याने व प्रतिवादींना दुसरा पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नायब तहसिलदार, तेल्हारा यांच्याकडे नवीन रस्ता मिळण्यासाठी प्रकरण दाखल केले होते व नायब तहसिलदार यांनी त्याबाबत योग्य आदेश पारीत केलेला असुन त्यांनी आदेशित केलेल्या रस्त्यावरुन प्रतिवादी त्यांच्या शेतीची वहिती विना अडथळा करीत असल्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान किंवा त्याच्या वहितीला अडथळा होत नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींना यापूर्वी पर्यायी रस्ता उपलब्ध नव्हता. त्यामुळे नायब तहसिलदार यांनी दिलेल्या रस्त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होत नसून याउलट वादींच्या मागणीप्रमाणे त्यांचेविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम झाल्यास त्यांना त्यांच्या शेताची वहिवाट तसेच शेतमालाची वाहतूक करता येणार नाही व त्यांचे अपरिमित नुकसान होईल, असे कथन करुन प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादींच्या कथनांचा विचार करता माझेसमोर खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले असून त्याचे निष्कर्ष मी कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | वादी मागणीप्रमाणे प्रकरण त्यांच्या बाजुने असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध करतात का? | होकारार्थी |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे वादी सिद्ध करतात का? | होकारार्थी |
| ३ | मागणीप्रमाणे मनाई हुकुम मंजुर न केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल हे वादी सिद्ध करतात का? | होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशप्रमाणे. |

५. वादी व प्रतिवादींच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

## <u>कारणमीमांसा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ३ करिता</u>

मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे ते एकत्र चर्चिले आहेत.

६. वादींच्या कथनावरुन असे दिसून येते की, प्रतिवादींना त्यांच्या शेतात जाण्यासाठी वादीच्या शेतातून रस्ता नाही. प्रतिवादींना नुराबाद गावठाण येथील रस्त्याने त्यांच्या शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध असताना देखील त्यांनी नायब तहसिलदार, तेल्हारा यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमच्या कलम १४३ नुसार प्रकरण दाखल करुन रस्त्याची मागणी केली व नायब तहसिलदार यांनी त्याच्या गट क्र. ४/अ च्या उत्तर धु–यावरुन प्रतिवादींना रस्ता दिलेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादींनी त्यांच्या नायब तहसिलदार यांचेपुढील अर्जामध्ये ते वादीच्या शेताच्या उत्तरेकडील धु–याच्या आतून त्यांच्या शेताची वहिती करीत होते; परंतु, त्याने प्रतिवादींना त्या रस्त्याने जाऊ न दिल्यामुळे व त्यांना पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याचे कथन करुन प्रतिवादींनी नवीन रस्ता देण्याची मागणी केली होती. वादीच्या कथनानुसार वास्तविक प्रतिवादींच्या कथनानुसार वादींनी त्याचा रस्ता अडवला असता तर मामलतदार कोर्ट कायद्याच्या कलम ५ नुसार रस्त्यातील अडथळा दूर करुन रस्ता खुला करुन मिळण्याकरिता प्रतिवादींनी प्रकरण दाखल करायला पाहिजे होते. प्रतिवादींनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार नवीन रस्ता तयार करुन देण्यासाठी केलेला अर्ज हा कायदेशीर नसल्यामुळे नायब तहसिलदार यांनी वादींच्या धु–यावरुन रस्ता करुन देण्याबाबतचा आदेश हा कायदेशीर नाही.

७. याउलट, प्रतिवादींनी दाखल केलेल्या लेखी युक्तिवादात असे कथन केलेले आहे की, वादीने दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशामध्ये दाखवलेला पर्यायी रस्ता उपलब्ध नव्हता. प्रतिवादींनी त्यांच्या शेतामध्ये जाण्यासाठी कोणताही हक्काचा रस्ता उपलब्ध नसल्यामुळे नायब तहसिलदार यांच्याकडे नवीन रस्त्याची मागणी केली होती व नायब तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३

नुसार वादीच्या गट क्र. ४/अ च्या उत्तर धु–यावरुन वहिती करण्याकरिता रस्ता दिलेला आहे.

८. प्रतिवादींनी नायब तहसिलदार यांचेसमोर केलेल्या अर्जात असे नमूद केल्याचे दिसून येते की, ते वादींच्या शेताच्या उत्तरेकडील धु–याच्या आतून त्यांच्या शेताची वहिती करीत होते; परंतु, मागील चार ते पाच महिन्यांपासून वादी क्र. २ ने त्यांना त्या रस्त्याने जाऊ दिले नाही व म्हणून त्यांनी नवीन रस्त्याची मागणी केलेली आहे. प्रतिवादींच्या सदर कथनावरुन असे दिसून येते की, ते वादीच्या शेताच्या उत्तरेकडील धु–याच्या आतून त्यांच्या शेताची वहिती करीत होते व वादींनी त्यांना जाण्यास मज्ञाव केला; परंतु, प्रतिवादींच्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, त्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी नवीन रस्ता मिळण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार अर्ज दाखल केला होता.

९. प्रतिवादींनी नायब तहसिलदार यांच्यापुढे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार अर्जातील कथनांचे सापेक्षपणे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने त्याच्या शेतातून जाण्याचा रस्ता अडवल्यामुळे त्यांनी अर्ज दाखल करुन नवीन रस्त्याची मागणी केली होती; परंतु, रस्ता खुला करुन मिळण्याच्या मागणीऐवजी प्रतिवादींनी नवीन रस्त्याची मागणी केली होती. सदर कथनांचा विचार करता वादींनी प्रतिवादींचा रस्ता अडवला, त्याकरिता प्रतिवादींनी मामलतदार कोर्ट कायद्याच्या कलम ५ नुसार त्यांचा रस्ता खुला करुन मिळण्यासाठी प्रकरण दाखल करणे आवश्यक होते; परंतु, नायब तहसिलदार, तेल्हारा यांनी प्रतिवादींच्या अर्जातील कथनांच्या अनुषंगाने वादींनी हा प्रतिवादींचा रस्ता अडवला आहे का ? याबाबत कोणतेही विवेचन केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे रस्ता अडवला असल्यास खुला करुन मागण्याचा पर्याय उपलब्ध असताना देखील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार नवीन रस्ता उपलब्ध करुन देण्याची प्रतिवादींची मागणी मान्य केल्याचे दिसून येते.

१०. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार नवीन रस्ता उपलब्ध करुन देण्याच्या मागणीचा विचार करत असताना पर्यायी रस्ता उपलब्ध आहे का, याबाबत चौकशी करणे आवश्यक आहे. संबंधित नायब तहसिलदार यांनी मुद्दा क्र. १ मध्ये असे निष्कर्ष नोंदवले आहेत की, 'महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार नवीन शेत रस्त्याची गरज असल्यास तो मान्य करण्याचे कायदेशीर अधिकार या न्यायालयाला आहेत', मुद्दा क्र. २ चे निष्कर्षामध्ये त्यांनी, 'नायब तहसिलदार यांनी स्थळ निरीक्षण केले असता, त्यांना कोणताही पर्यायी रस्ता दिसून आला नाही' व मुद्दा क्र. ३ मध्ये 'अर्जदार यांनी मागणी केलेला रस्ता हाच सर्वात कमी अंतराचा व पिकांचे कमीत कमी नुकसान करणारा असल्याचे सिद्ध झाल्याचे,' निष्कर्ष नोंदवले आहेत; परंतु, संबंधित नायब तहसिलदार यांनी अर्जदारांच्या म्हणजेच प्रतिवादींच्या कथनानुसार वादींनी त्यांचा रस्ता अडवला व त्यामुळे तो खुला करुन मागण्याचा पर्याय, याबाबत मत न नोंदवता केवळ प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार दाखल केल्यामुळे पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याचे मत नोंदवून नवीन रस्त्याची मागणी मान्य केल्याचे दिसून येते.

११. वादींच्या कथनानुसार प्रतिवादींना त्यांच्या शेताची वहिती करण्याकरिता दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशात दाखवल्याप्रमाणे मौजे नुराबाद गावठाणाकडून पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. प्रतिवादींनी सदर पर्यायी रस्ता असल्याचे मान्य केले नसले तरी देखील वादींनी त्यांच्या शेतातून त्यांना जाण्यास मज्ञाव केला त्यामुळे प्रतिवादींनी नायब तहसिलदार, तेल्हारा यांच्याकडे नवीन रस्त्याच्या मागणीकरिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १४३ नुसार दाखल केले. परंतु, अर्जातील कथनांचा विचार करता सदर प्रकरण क्र. ६/२०२३ हे कायदेशीरदृष्ट्या योग्य नसल्यामुळे नायब तहसिलदार, तेल्हारा यांच्या दि. ०७/१०/२०२४ रोजीच्या आदेशानुसार वादींच्या धु–यावरुन प्रतिवादींच्या वहितीसाठी करुन दिलेल्या रस्त्याचा आदेश कायदेशीरदृष्ट्या योग्य आहे, असे म्हणता येणार नाही. विशेष म्हणजे नायब तहसिलदार यांनी वादींच्या उत्तर धु–यावरुन नवीन रस्ता देत असताना धु–याची रुंदी किती आहे, त्यावरुन बैलगाडी किंवा ट्रॅक्टर ही शेतमालाची वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी वाहने जाण्यास इतपत रस्ता आहे का, याची पाहणी केली व त्याबाबत

निरीक्षण नोंदवलेले, असे कुठेही दिसून येत नाही. त्यामुळे घटनास्थळ धु–यावर जर बैलगाडी किंवा ट्रॅक्टर इत्यादी वाहने जाण्याइतपत जागा नसेल तर पर्यायाने त्या रस्त्याने वहिती करीत असताना वादींच्या शेतातील पिकाचे नुकसान होण्याची शक्यता आहे, ही बाब विचारात न घेतल्याचे दिसून येते. सबब, प्रकरण सकृतदर्शनी वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादींनी त्या आदेशानुसार वादींच्या धु–यावरुन वहिती चालू ठेवल्यास वादींच्या शेतातील पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींविरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकूम करण्याबाबतची मागणी ही संयुक्तिक वाटत असून, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने झुकल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तसेच वादींच्या मागणीप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा आदेश न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल, या त्यांच्या मागणीत तथ्य असल्याचे दिसून येत असल्याने मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ व त्यांचे प्रतिनिधी, नोकर इत्यादी यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत वादींच्या गट क्र. ४/अ च्या उत्तरेकडील धु–यावरुन त्यांचे शेताची वहिती करु नये, असा त्यांचे विरुद्ध तुर्तातुर्त हुकुमाचा आदेश करण्यात येतो.

RAHUL KESHAV DESHPANDE

Digitally signed by RAHUL KESHAV DESHPANDE
Date: 2025.08.14 10:44:22 +0530

दिनांक– ११.०८.२०२५
तेल्हारा

( आर. के. देशपांडे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
तेल्हारा.